# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 30/11/2020 (सोमवार)

---

## अपघातात मृत्यु

१) पोलीस ठाणे नरखेड :– अंतर्गत दिनांक २९/११/२०२० चे ०७.०० वा. दरम्यान मौजा पिपळा केवळराम शिवारात महिन्द्रा पिक अप क्र एमएच ४०/ वाय ७७८० च्या चालकाने आपले वाहन भरदाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन ॲक्टीवा दुचाकी वाहन क्र एमएच ४०/ एव्ही ११८२ ला धडक मारल्याने ॲक्टीवा चालक अरुन वसुले हे मरण पावले. सदर प्रकरणी पोलीस ठाणे नरखेड येथे फिर्यादी दिपक तुळशीराम बाळबुधे यांचे तक्रारीवरुन कलम २७९, ३०४(अ) सहकलम १३४, १८७ मोवाका अन्वये महिन्द्रा पिक अप च्या चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री दततदत्रय कोलटे हे करीत आहेत.

२) पोलीस ठाणे रामटेक :– अंतर्गत दिनांक २९/११/२०२० चे १८.२० ते १८.३० वा. दतम्यान मौजा कांद्री मनसर शिवारात फिर्यादी नामे सचिन सुधाकर शनिवारे, वय ३५ वर्षे, रा. नंदनवन, नागपूर हे नागपूर येथे जात असतांना एका अज्ञात पांढऱ्या रंगाच्या कार चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन समोरुन येणाऱ्या दुचाकीस धडक मारल्याने दुचाकी फिर्यादी यांचे कारवर आदळून दुचाकीस्वार गंभीर जखमी होवुन मोगे बसलेले दशरथ बकाराम राऊत, वय ३५ वर्षे रा. कैची माईन हे मरण पावले. सदर प्रकरणी पोलीस ठाणे रामटेक येथे फिर्यादी यांचे तक्रारीवरुन कलम २७९, ३३८, ३०४(अ) सहकलम १३४, १७७, १८४ मोवाका अन्वये अज्ञाात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीमती बारंगे या करीत आहेत.

३) पोलीस ठाणे पारशिवनी :– अंतर्गत दिनांक २८/११/२०२० चे २१.०० वा. दरम्यान मौजा दहेगाव फाट्याजवळ मोटार सायकल स्वार जितेंद्र अमरराव कोरडे, वय २३ वर्षे, रा. तिगाव, पांढुर्णा (म.प्र.) याने आपले दुचाकी वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन रोडच्या बाजुला स्थित ईलेक्ट्रीक खांबाला धडक मारुन अपघात केला. अपघातात मोटार सायकल स्वार आणि त्याचे गाडीवर बसलेला दिनेश भिमराव सोनवाने, वय २८ वर्षे, रा.वडेगाव, ता.पाढुर्णा हे दोघेही

मरण पावले. सदर प्रकरणी पोलीस ठाणे पारशिवनी  येथे फिर्यादी प्रितम अमरचंद धुर्वे, वय ३० वर्षे, रा. मोहखेडी यांचे तक्रारीवरुन कलम २७९, ३३७, ३०४(अ) सहकलम १८४ मोवाका अन्वये जितेंद्र अमरराव कोरडे विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री पळनाटे हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर.